बी.डी.डी. चाळींमध्ये पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना दिलेल्या सेवा निवासस्थानांच्या बदल्यात द्यावयाच्या पुनर्विकसित गाळ्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

गृहनिर्माण विभाग

शासन निर्णय क्रमांक :- बैठक-२०२१/प्र.क्र.१४८/गृनिप

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- १८ ऑगस्ट, २०२१.

वाचा :- १) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक : विविचा-२००७/ प्र.क्र. ५१ (भाग-१) /गृनिप, दि.३०.०३.२०१६

२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक: बैठक- २०२१/ प्र.क्र.१४८/ गृनिप, दि.०९.०७.२०२१

३) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. जा.क्र.आ.अ./प्रा./ मु.अ. /बी.डी.डी. /मुं.मं. /ईटी- ६५ /२०२१, दि.२०.०७.२०२१

प्रस्तावना :-

तत्कालीन मुंबई विकास विभागाने (बी.डी.डी.) सन १९२१-१९२५ च्या दरम्यान मुंबईतील वरळी, नायगांव, ना. म. जोशी मार्ग व शिवडी येथे एकूण २०७ चाळी बांधलेल्या आहेत. प्रत्येक चाळ ही तळ + ३ मजल्यांची असून त्यात प्रत्येकी जवळपास ८० प्रमाणे रहिवाशी गाळे आहेत. तसेच या बी. डी. डी. चाळींच्या परिसरात झोपडपट्टीसदृश्य बांधकामे स्टॉल्स, दुकाने, सामाजिक / शैक्षणिक संस्था देखील आहेत. सदर बी.डी.डी. चाळी जवळपास ९६ वर्षापेक्षा जास्त जून्या झालेल्या असल्याने त्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेतलेला आहे व तसे आदेश संदर्भ क्र.१ येथील दि.३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

२. बी.डी.डी. चाळींमध्ये काही शासकीय विभागांना सेवानिवासस्थाने म्हणून काही सदनिका भाडेदारीने देण्यात आलेल्या आहेत. वाचा क्र.१ येथील दि.३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये, बी. डी.डी. चाळींच्या पुनर्विकासानंतर तेवढ्या पुनर्वसन सदनिका संबंधीत शासकीय विभागांना (प्रशासकीय विभागांना) उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत. बी. डी. डी. चाळींमध्ये पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थाने उपलब्ध करून दिलेली आहेत.

३. राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना निवासस्थाने उपलब्ध करून देणे हा एक संवेदनशील प्रश्न आहे. राज्यातील विशेषत: मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांना उपलब्ध असलेली सेवा निवासस्थाने यांचे प्रमाण व्यस्त आहे. महाराष्ट्र राज्याच्या पोलीसांचे ब्रिदवाक्य "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय" हे असून या ब्रीद वाक्यानुसार पोलीस कर्मचारी त्यांचे कर्तव्य बजावत असतात. राज्यात कोणतीही आपत्ती वा संकट आल्यास त्यास सर्वप्रथम पोलीस यंत्रणा धावून जात असते. बी.डी.डी. चाळीत तर काही पोलीस कर्मचारी २-२ पिढ्यांपासून रहात आहेत. या सर्व बाबींचा

साकल्याने विचार करुन, पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना जी सेवा निवासस्थाने उपलब्ध करून दिलेली आहेत. ती त्वरीत रिकामी करून देण्याबाबत व सेवानिवृत्त तसेच दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पांतर्गत कायमस्वरूपी निवासस्थाने कशाप्रकारे उपलब्ध करून देता येतील यावर उपाययोजना सुचविण्यासाठी, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. २९/०६/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने, संदर्भ क्र. २ येथील दि.०९.०७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवाला संदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन, शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

बी. डी. डी. चाळींमध्ये पोलीस विभागामार्फत पोलीस कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून दिलेली सेवा निवासस्थाने रिकामी करून देण्याबाबत व सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी तसेच दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदरहू पुनर्विकास प्रकल्पांतर्गत कायम स्वरूपी निवासस्थाने कशाप्रकारे उपलब्ध करून देता येतील, यावर उपाययोजना सुचविण्यासाठी तसेच, तद्नुषंगीक मुद्यांबाबत सखोल अभ्यास करून सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी दि.०९.०७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मा. मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली व मा. मंत्री (गृह) यांच्या सह अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने त्यांचा अहवाल संदर्भ क्र.३ येथील दि.२०.०७.२०२१ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

२. उपरोक्त समितीने सादर केलेला अहवाल, बी. डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासंबंधात दि.१९.०८.२०१९ व दि.०३.०२.२०२० च्या शासन निर्णयान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीसमोर दि.२२.०७.२०२१ रोजी ठेवण्यात आला. दि. ०९/०७/२०२१ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालास अनुसरून व मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.०७.२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, याबाबत शासनाने असा निर्णय घेतला आहे की, बी. डी. डी. चाळींमध्ये दि.०१.०१.२०११ रोजी पर्यंत जे पोलीस कर्मचारी पोलीस सेवा निवासस्थानात वास्तव्यास आहेत (सेवेत कार्यरत, सेवानिवृत्त व दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारस इत्यादी) त्यांना बी. डी. डी. चाळींच्या पुनर्विकासातंर्गत ५०० चौ. फूट क्षेत्रफळाचा पुनर्विकसीत गाळ्याचे वितरण मालकी तत्त्वावर करण्यात यावे. त्यासाठी त्यांच्याकडून पुनर्विकसीत गाळ्याच्या बांधकाम खर्चाची रक्कम (Construction Cost) आकारण्यात यावी.

३. पोलीस आयुक्तालय, मुंबई यांनी दि.०१.०१.२०११ रोजी पर्यंतची बी.डी.डी. चाळीतील पोलीस सेवा निवासस्थानात वास्तव्यास असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची यादी /तपशील (सेवेत कार्यरत,

सेवानिवृत्त व दिवंगत पोलीस कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारस इत्यादी) संचालक, बी.डी.डी. चाळी व मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांना उपलब्ध करुन द्यावा. सदर यादी /तपशील तयार करताना आवश्यक त्या कागदपत्रांची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी पोलीस आयुक्तालय, मुंबई यांची राहिल. तसेच पोलीस आयुक्तालय, मुंबई यांनी उपलब्ध करुन दिलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या पात्रतेबाबत कोणताही वाद उद्भवल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारीही पोलीस आयुक्तालय, मुंबई यांचीच राहिल. या लाभार्थ्यांच्या पात्रतेसंदर्भात उद्भवणारे कोणतेही दावे संचालक, बी.डी.डी. चाळी व मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्याकडून हाताळले जाणार नाहीत.

४. बी. डी. डी. चाळीतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या सेवा निवासस्थानाबाबत शासनाने घेतलेल्या या निर्णयाची माहिती बी. डी. डी. चाळीतील पोलीस कर्मचाऱ्यांपर्यंत /त्यांच्या वारसांपर्यंत योग्य रितीने पोलीस आयुक्तालय, मुंबई यांनी पोहचवावी. तसेच बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने पोलीस कर्मचाऱ्यांनी मा. उच्च न्यायालयात दखल केलेल्या दाव्यांमध्ये, प्रस्तुत शासन निर्णयाची माहिती मा. उच्च न्यायालयास अवगत करून, मा. उच्च न्यायालयात दाखल असलेले दावे निकाली निघण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा / विनंती पोलीस आयुक्त, मुंबई यांनी मा. उच्च न्यायालयाकडे करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२१०८१८१९०५१९४५०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arvind Tulshiram Shete

Digitally signed by Arvind Tulshiram Shete
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d33ed79e4d2d2921d0ca79b9de78ffea75e5f9801c0d3d15f5ca38bf6aab62, serialNumber=822dcc75affe36bfe50f258ebb574ffef9d5ea24e97a344 2a9c1b3323aaca40, cn=Arvind Tulshiram Shete
Date: 2021.08.18 18:15:26 +05'30'

(अरविंद शेटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. सभापती / मा. उपसभापती विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
३) मा. अध्यक्ष / मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८) मा. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

९) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. मंत्री (पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई
१३) मा. संसद सदस्य / मा. विधान परिषद सदस्य / मा. विधानसभा सदस्य (सर्व)
१४) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१५) अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय, मुंबई.
१६) प्रधान सचिव (गृहनिर्माण), मंत्रालय, मुंबई.
१७) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
१९) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, (म्हाडा), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
२०) पोलीस आयुक्त, मुंबई
२१) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व). मुंबई.
२२) उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) निवडनस्ती (गृनिप).